TenderID.2026_SANGL_

# महाराष्ट्र शासन
## ग्रामविकास व जलसंधारण विभाग
## इवद(बांधकाम)विभाग जिल्हा परिषद,सांगली
## ई-निविदा सूचना 2026-2027 (NIT)क्रमांक 02

सांगली जिल्हा परिषद सांगलीकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दोन लिफाफे पध्दतीने खालील कामाच्या ई-निविदा मागवीतआहे. ई-निविदा http://www.mahatenders.gov.inया संकेत स्थळावर सर्व कामे दिनांक 14/05/2026 रोजीसायंकाळी 17.00 वाजले पासून दिनांक 08/06/2026रोजी सायंकाळी 17.00 वाजे पर्यंत ई-निविदा पध्दतीने देण्यात व स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचेनांव | कामाची रक्कम (सर्व करवगळून) | बयाणारक्कमरुपये | कामपूर्णकरणेमुदत (दिवस) | को-यानिविदा संचर.रु. | अधिकृत ठेकेदारवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | जत तालुक्यातील श्री बनशंकरी देवस्थान मौ.बनाळी येथे सभामंडप बांधणे.(ब वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास) | 7942012 | 80000 | 180 दिवस | 5000 | खुला मक्तेदार वर्ग 4-अ व त्यावरील |
| 2 | जत तालुक्यातील श्री बनशंकरी देवस्थान मौ.बनाळी येथे परिसरात विविध सोई सुविधा पुरविणे व परिसर सुधारणा करणे.(ब वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास) | 7893920 | 79000 | 180 दिवस | 5000 | खुला मक्तेदार वर्ग 4-अ व त्यावरील |
| 3 | जत तालुक्यातील श्री रामेश्वर देवस्थान मुचंडी येथे परिसरात विविध सोई सुविधा पुरविणे व परिसर सुधारणा करणे.(ब वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास) | 7650933 | 77000 | 180 दिवस | 5000 | खुला मक्तेदार वर्ग 4-अ व त्यावरील |
| 4 | जत तालुक्यातील श्री रामेश्वर देवस्थान मुचंडी येथे सभामंडप बांधणे.(ब वर्ग ग्रामीण तिर्थक्षेत्र विकास) | 7512909 | 76000 | 180 दिवस | 5000 | खुला मक्तेदार वर्ग 4-अ व त्यावरील |

१) .उपरोक्त कामाची बयाणा व निविदा संचाची किंमत ही ऑनलाईन पध्दतीने नेट बँकिंगव्दारे वेबसाईट वर दिलेल्या पेमेंट मार्गानेच करणे बंधनकारक आहे. तसेच पूर्णत: यशस्वी झालेली पेमेंट स्लीप तांत्रिक लखोटयात अपलोड करणे अनिवार्य आहे.

२) लगतच्या महिन्यातील जीएसटी आर-१/जीएसटी ३ बी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत जोडणे आवश्यक.

३) सन २०१७-१८ च्या दरसूचीन्वये यांत्रिकी पध्दतीने बनविलेली खडी या साहित्यावर रॉयल्टी (स्वामित्वधन) आकारण्यात येणार नाही. तथापि दर पृथकरणामध्ये ती दिली गेली असल्यास ती वजा करुनच (घटीत दराने) देयक अदा केले जाईल.

४) २०२३-२०२४ २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मधील जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मदुतीत दिनांक ३१/०३/२०२६ अखेर भौतिकदृष्टया पूर्ण नसल्यास (योग्य कारणाशिवाय पूर्ण नसल्यास) सदर मक्तेदारास या निविदा सूचनामधील भरलेल्या निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल. (याबाबतचे स्वतंत्र प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्रं.०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे.)

५) मक्तेदाराने निविदा भरण्यापूर्वी उप अभियंता (इवद) पं.स.जत यांचा स्थळ पाहणीचा दाखला घेणे (GEO-TAGGING फोटो बरोबर स्वत: ठेकेदार अथवा प्रतिनिधी असने) बंधनकारक आहे.स्थळ पाहणीचा दाखला जोडला नसलेस सदर निविदेतून मक्तेदारास अपात्र करणेत येईल याची नोंद घ्यावी

६) मक्तेदारने निविदा भरतेवेळी SIMILAR TYPE OF WORK DONE दाखला सादर करणे अनिवार्य राहील.

७) निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे,प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखुन ठेवला आहे.

**८)** निविदेच्याअटीवशर्तीमध्येबदलकरणे,प्राप्तनिविदेपैकीएककिंवासर्वनिविदाकोणतेहीकारणनदेतानाकारणेचाहक्कनिम्नस्वाक्षरीतयांनीराख ूनठेवलाआहे.

**सही**/xxxx
**कार्यकारी अभियंता (इवद)**
**जिल्हा.परिषद,सांगली**

# स्वयं घोषणापत्र

**(सदरचे स्वयं घोषणापत्र तांत्रिक लिफाफा क्रं. ०१ मध्ये, सुबेअ/सोसायटीच्या/मक्तेदारांच्या लेटरपॅड वर / साध्या कागदावर स्वसाक्षांकित करुन अपलोड करणे आवश्यक आहे.)**

मी ______________________________ वय वर्षे _______ राहणार ______________ या घोषणापत्राद्वारे लिहून देतो की, मी ____________________ मजूर सहकारी संस्था / सुशिक्षित बेरोजगार अभियंता / चेअरमन / सचिव / फर्मचा / कंपनीचा मालक असून नोटीस क्रं. _____ मधील काम क्र. _____ कामाचे नाव __________________________ या कामासाठी निविदा सादर करीत आहे. सदर कामासाठी भरलेली माझी निविदा स्विकृत झाल्यास सदर कामासाठी आवश्यक असणारी सर्व यंत्र सामुग्री भाडे कराराने अथवा खरेदीने उपलब्ध करुन सदरचे काम गुणवत्तेने व निविदेमधील कालमर्यादेत पूर्ण करणेची हमी मी या स्वयं घोषणापत्राद्वारे देत आहे.

सदरचे काम मी गुणवत्तेने व निविदेमधील कालमर्यादेत पुर्ण केले नाही तर निविदेतील अटी व शर्तीनुसार शासकिय कारवाईस पात्र राहीन. तसेच निविदेतील अटी व शर्तीचा आणि स्वयं घोषणापत्राचा भंग झाल्यास माझी नोंदणी निलंबित अथवा रदद होवू शकते याची मला जाणीव आहे.

माझा आधार क्र. - - - - - - - - - - - - - - - - हा आहे.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**

# प्रमाणपत्र

**(सदरचे प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्रं. ०१ मध्ये, मक्तेदारांच्या / सोसायटीच्या स्वत:च्या लेटरपॅड वर, अपलोड करणे आवश्यक आहे)**

सदर निविदा सूचना क्र. ___ मधील काम क्रं. ____________ हे मी भरलेले असून, यापूर्वी सन २०२२-२०२३ २०२३-२०२४ २०२४-२०२५ मधील जि.प.सांगली कडील (मला / आमचे सोसायटीस मिळालेल्या) सर्व योजनांची कामे (मी / आम्ही) विहित मुदतीत किंवा वाढीव मुदतीत **भौतिक किंवा आर्थिकदृष्टया पूर्ण केलेली आहेत.**

दिनांक ३१/०३/२०२५ अखेर सन २०२२-२०२३,२०२३-२०२४,२०२४-२०२५ मधील काम माझे / आमचे कडून _________________ हि कामे अपूर्ण आहेत. (अपूर्ण असल्यास, कामांची नावे तसेच त्यांबाबत समर्पक कारणासह, योग्य त्या कागदपत्रासह, स्पष्टता करावी).

वर नमूद केलेली माहिती, जर का चुकीची अथवा अपूर्ण कामाबाबतची कारणे असमर्थनिय असल्यास, सदर निविदेमधून (माझी / आमची निविदा) अपात्र करण्यात येईल याची मला / आम्हाला माहिती आहे.

सही /- ________

मक्तेदाराचे नाव ________

## परिशिष्ट -०१

## नमुना करारपत्र / सत्यप्रतिज्ञापत्र (Notarized / Affidavit)
## (र.रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)

मी ______________________________ वय वर्षे _______ राहणार ______________ या करारपत्राव्दारे / सत्यप्रतिज्ञापत्राव्दारे लिहून देतो की, मी ___________________ या फर्मचा / कंपनीचा मालक / चेअरमन असून नोटीस क्रं. _____ मधील काम क्र. _____ कामाचे नाव _________________________ या कामासाठी निविदा सादर करीत आहे. या निविदेच्या लिफाफा क्रं.०१ मध्ये, मी सादर केलेली सर्व कागदपत्रे खरी, बरोबर व पूर्ण आहेत. त्यामध्ये कोणत्याही त्रुटी / चुका नाहीत, याची मी खात्री केलेली आहे, असे शपथपूर्वक खालील अटी व शर्थीसह मान्य करीत आहे.

या करारपत्रामध्ये / निविदे संदर्भात सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण माहिती आढळल्यास, भारतीय दंडसंहिता अंतर्गत मी / आम्ही कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

जर कंत्राट कालावधी दरम्यान मी / माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी, जि.प. कार्यालयास कोणतीही खोटी माहिती किंवा देयका सोबत तसेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

जर कंत्राट कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यत, मी /आम्ही, सादर केलेली कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास, मी / आम्ही भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

जर काम समाप्ती नंतर किंवा कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी / आम्ही भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशी कार्यवाहीस पात्र राहीन आणि माझी / आमची सांगली जिल्हा परिषदेकडे झालेली नोंदणी कायमची रद्द करण्यात येवून मला / आम्हाला काळया यादीत टाकणेत येईल याची मला / आम्हाला कल्पना आहे.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**

**इवद (बांधकाम) विभाग जिल्हा परिषद, सांगली**

**ई-निविदा (NIT) सूचना क्रमांक ०२/२०२६-२०२७**

१) सदर संपूर्ण निविदा प्रक्रिया ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणकीय आज्ञावलीत होईल. सदर निविदे संदर्भातील निविदा नोटीस प्रसिध्दी, सूचना, शुध्दीपत्रके इत्यादीची माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२) उपरोक्त कामाची बयाणा व निविदा संचाची किंमत ही ऑनलाईन पध्दतीने नेट बँकिंगव्दारे / वेबसाईट वर दिलेल्या पेमेंट मार्गानेच करणे बंधनकारक आहे. तसेच पूर्णत: यशस्वी झालेली पेमेंटस्लीप / स्क्रोल / बं ॅक स्टेटमेंट, तांत्रिक लखोटयात अपलोड करण्यात यावी.

३) संबंधित कंत्राटदाराने वरीलप्रमाणे तांत्रिक लिफाफा सोबत विहित नमुन्यातील प्रमाणपत्र अपलोड केल्यानंतर, सदरील प्रमाणपत्राची मूळ प्रत कार्यालयास जमा करण्याची आवश्यकता असणार नाही.

४) कंत्राटदारांनी निविदा खालीलप्रमाणे दोन लिफाफा पध्दतीने (Two Envelopes) निविदा सादर करणे आवश्यक आहे.

**अ) फी / पात्रता / तांत्रिक (लिफाफा क्र. ०१ मध्ये सादर करावयाची) कागदपत्रे**

१) निविदा डाऊनलोड (Download) करणेसाठी निविदा फी व बयाणा रक्कम नेट बँकिंग व्दारे भरणा केलेली ऑनलाईन प्रत अपलोड करणे अनिवार्य आहे.

२) निविदा संच फी व १% इसारा (बयाणा) रक्कम, सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांनी स्वत:च्या बँक खात्यामूधन व खुला मक्तेदारांनी प्रो.प्रा.असल्यास स्वत:च्या व फर्म असल्यास फर्मच्या बँक खात्यातून ऑनलाईन नेट बँकिंगव्दारे भरणा करणे बंधनकारक असून, सदर रक्कम बँकेत भरणा केल्याचे पेमेंटस्लीप / स्क्रोल /बँक स्टेटमेंट (बँक खाते उतारा) स्कॅन करुन लिफाफा नं. १ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे. सदर बाबीचे उल्लघंन झाल्याचे निदर्शनास येईल त्या स्तरावर संबंधितास अपात्र करण्यात येईल.

३) जि.प.सांगलीकडे नोंदणी केलेल्या वैध नोंदणी प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करणे अनिवार्य आहे.

४) परिशिष्ट १ मधिल करारपत्राच्या नमुन्यानुसार, र.रु.३.०० लक्ष चे आतील (स्थानिक) व रु.३.०० लक्ष वरील किंमतीच्या ई-निविदेसोबत जोडलेली /अपलोड केलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे र.रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञा पत्र करुन, लिफाफा क्रं.०१ मध्ये जोडणे / ऑनलाईन अपलोड करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. तसेच सदर निविदा नोटीस मधील एक अथवा जादा कामासाठी एकच करारपत्र / सत्यप्रतिज्ञापत्र स्विकारण्यात येईल, तथापी निविदा नोटीस बदल्यास त्या निविदा नोटीसमधील कामांसाठी दुसरे करारपत्र / सत्यप्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

५) निविदा स्विकृतीपूर्वी निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रात, कार्यारंभ आदेश स्तरावर व ते निर्गमित केल्यानंतर अथवा निविदा कालावधी दोषदायित्व कालावधीतील पत्रव्यवहार यात व देयक अदा करताना, कोणतीही कागदपत्रे खोटी असल्याचे आढळून आल्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील, निविदा छाननी करणारे अधिकारी/कर्मचारी जबाबदार असणार नाहीत. त्यामुळे भा.द.वि.सं.अंतर्गत कंत्राटदाराविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६) सन २०२२-२०२३,२०२३-२०२४,२०२४-२०२५ मधील जि.प.सांगली कडील सर्व योजनांची कामे विहित मुदतीत किंवा वाढीव मुदतीत दि.३१/०३/२०२५ अखेर भौतिकदृष्टया (योग्य कारणाशिवाय) पूर्ण नसल्यास, संबंधित मक्तेदारास या निविदा सूचनामधील भरलेल्या निविदामधून अपात्र ठरविण्यात येईल. (या संदर्भात, विहीत नमुन्यातील प्रमाणपत्र तांत्रिक लिफाफा क्रं. ०१ मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे.)

७) महाराष्ट्र शासन, सार्वजनिक बांधकाम विभागकडील शासन निर्णय क्र. : सीएटी/२०१७/प्र क्र ०८/इमा-२, दि.२७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्र. ५.५ नुसार निविदेमध्ये देणेत आलेले स्वयं घोषणापत्र स्वत:च्या लेटरपॅडवर / साध्या पानावर स्वसाक्षांकित केल्याची प्रत अपलोड करणे अनिवार्य आहे.

८) सन २०२५-२०२६ असेसमेंट ईअर प्राप्तीकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र / सुबेअ व मजूर सहकारी सोसायटी यांच्यासाठी प्राप्तीकर नसल्यास पॅनकार्डची स्कॅन केलेली प्रत अपलोड करणे अनिवार्य आहे.

९) भागीदारी प्रमाणपत्राची स्कॅन केलेली प्रत अथवा नोटरी केलेले भागीदारी करारपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे.

१०) मक्तेदारांस देयके अदा करतांना GSTN असल्याशिवाय देयके अदा करता येणार नसल्याने निविदा भरणा-या सर्व मक्तेदाराकडे GSTN असणे आवश्यक आहे. निविदा भरण्याच्या दिनांकापूर्वी संबंधित विभागाकडे GSTN साठी साठी मागणी केली असल्यास संबंधित विभागाची पोहोच दर्शविणा-या पत्राची प्रत निविदेबरोबर जोडली (अपलोड) असल्यास सदर मक्तेदारांना पात्र केले जाईल. परंतु प्रथम देयकांवेळी किंवा पहिले व अंतिम देयकावेळी GSTN नोंदणी प्रमाणपत्र उपलब्ध न झालेस देयक अदा केले जाणार नाही. म्हणजेच GSTN असणा-या किंवा मागणी केलेल्या मक्तेदारांनाच पात्र करण्यात येईल.

११) मा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडील पत्र जा.क्रं.अति मुकाअ/ पी.ए./ ५६१/ २०२० दि.२८/१२/२०२० व मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सांगली यांचेकडील पत्र जा.क्रं.अति मुकाअ/ पी.ए./ ५७८/ २०२१ दि.०९/०२/२०२१ नुसार, मजूर सहकारी संस्थाकडील सर्व मजूरांची नोंदवहीची प्रत, संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचे सही व शिक्क्यांने (Self attested) अपलोड करणे, अनिवार्य आहे.

१२) मजूर सहकारी संस्था यांनी मजूरांच्या खात्यामध्ये परिश्रमिक मूल्य /रोजंदारीची रक्कम जमा करणे आवश्यक आहे. कामांवर प्रत्यक्षात तेच मजूर उपस्थित राहतील याची दक्षता घेवून मजूरांना ओळखपत्रे देणे आवश्यक आहे.

१३) मजूर सहकारी संस्था यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ अंतर्गत सर्व नियम व अटी यांचे पालन करणे आवश्यक आहे.

**१४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय क्रं.सीएटी-२०२२/प्र.क्र.५०/इमा.२ दिनांक ११/०५/२०२२ रोजीचा शासन निर्णयान्वये**

१) शासन निर्णय दि.२७/०९/२०१८ अन्वये परिच्छेद ५.५ मधील तरतूदीनुसार रु.१.५० कोटी रक्कमेच्या कामांसाठी तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांच्या कामांसाठी Hot Mix Plant/Batch Mix Plant/Machinery यांच्या मालकीबाबतची अट निविदेमध्ये समाविष्ठ न करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या होत्या. तथापि आता रु.५० लक्षपर्यंतच्या रस्ते डांबरीकरण, पूल व इमारती कामांसाठी स्व:मालकीची अट निविदेमध्ये घालण्यात येवू नये.

२) शासन निर्णय दि.२७/९/२०१८ अन्वये परिच्छेद क्र.२.९ मधील तरतूदीनुसार कंत्राटदाराची कमाल उलाढाल मागील ५ वर्षासाठी नमूद केली आहे. तथापि कोविड महामारीमुळे उद्भवलेली विशिष्ट परिस्थिती विचारात घेवून कंत्राटदाराची उलाढाल मागील ५ वर्षाऐवजी ७ वर्षे विचारात घेण्यात यावी. तसेच शासन निणर्य दि. २७/९/२०१८ मधील परिच्छेद २.९ मध्ये नमूद कंत्राटदाराने केलेले तुल्यबळ किंमतीचे काम, देय कामाचे महत्त्वाचे परिणाम व Bid Capacity यासाठी ५ वर्षाऐवजी ७ वर्षे कालावधी विचारात घेण्यात यावा. सदर सवलत केवळ मार्च २०२३ अखेर लागू राहील.

३) शासन परिपत्रक दि.१७/९/२०१९ अन्वये रु. ३ लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदामध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच Bid Capacity परिगणित करतांना {(अ `XएनX२)-बी} ऐवजी {(अ `XएनX१.५)-बी} प्रमाणे परिगणना करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. कोविड महामारीमुळे उद्भवलेली विशिष्ट परिस्थिती विचारात घेवून Bid Capacity परिगणित करतांना पूनश्च: {(अ `XएनX२)-बी} याप्रमाणे Bid Capacity परिगणित करण्यात येईल

४) शासन परिपत्रक दि.१७/९/२०१९ अन्वये रु. ३ लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदामध्ये Bid Capacity ची अट समाविष्ट करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि आता रु.५० लक्ष किंमतीच्या वरील सर्व कामांसाठी Bid Capacity ची अट लागू करावी. तथापि एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षात तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी बीड कॅपीसीटीची शर्त लागू राहील. याबाबत खातरजमा करण्यासाठी लिफाफा क्र.१ मध्ये चालू वित्तीय वर्षात हाती घेतलेल्या सर्व कामांची निविदा विषयक माहिती सादर करणे कंत्राटदारास अनिवार्य आहे.

५) शासन निर्णय दि.२८/११/२०१८ अन्वये रु.३ लक्ष आतील स्थानिक व रु.३ लक्ष वरील किंमतीच्या ई-निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे रु.५०० स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र लिफाफा क्र.१ मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात आले आहे.

६) सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना रु.३० लक्ष किंमतीपर्यंतच्या फर्निचर कामांसाठी फर्निचर व तत्सम कामांसाठी आवश्यक असणाऱ्या नोंदणी प्रमाणपत्रातून सूट देण्यात येत आहे.

**१४) अनावश्यक व कालबाहय झालेली कागदपत्रे सादर केलेस संबंधित मक्तेदारास विना नोटीस अपात्र करणेत येईल.**

**ब) आर्थिक लिफाफा (लिफाफा क्रमांक ०२)**

१) कंत्राटदारांनी आपले दर विहित "BOQ" मध्ये योग्य त्या जागी करुन सदरची "BOQ" लिफाफा क्रमांक ०२ मध्ये अपलोड करावी. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या निविदेचे दर इतर कोठेही नमूद करणेत येऊ नयेत.

२) स्थायी समिती जि.प.सांगली कडील सभा दि.०२/११/२०१८ ठराव क्रं.२३१ अन्वये मक्ता मंजूरीनंतर १५ दिवसांत स्टॅम्प पेपर देवून व अनामत रक्कम भरुन कार्यारंभ आदेश घेणे बंधनकारक आहे. तसे न केलेस एल-१ (निम्नस्तर) असून सुध्दा त्या मक्तेदारास त्या निविदेस हक्क राहणार नाही. सदर मक्तेदाराची ईएमडी जप्त करुन त्याच मक्तेदारास वेळेचा अपव्यय करणे म्हणून नोंदणी तीन महिन्यासाठी निलंबित केले जाईल. तद्नंतर सदरचे काम तात्काळ व्दित्तीय (निम्नस्तर) मक्तेदार एल २ ला जर एल १ च्या दराने करणेस तयार असेल तर तात्काळ स्टॅम्प पेपर व अनामत रक्कम भरणेस तयार असेल तर त्यास देणेत येईल. अन्यथा दुबरा फेर ई-निविदा प्रक्रिया राबविणेत येईल.

३) मा.विभागीय आयुक्त पुणे विभाग पुणे यांचेकडील परिपत्रक क्रं.विकास/कार्यासन-५/कावि-११३९/२०१८ दिनांक ०५/०९/२०१८ अन्वये मक्तेदारांनी जर का मुदतीत काम पूर्ण न केल्यास सदर परित्रकात नमूद केलेप्रमाणे दंडाची आकारणी केली जाईल. (सोबत सदर परिपत्रकाची प्रत अपलोड केलेली आहे)

४) शासन परिपत्रक क्रं.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२/दिनांक २६/११/२०१८ अन्वये अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम (Additional Performance Security Deposit) निविदा लिफाफा क्रं.०२ मध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना रद्द करण्यात येत असून लिफाफा क्रं.०१ व लिफाफा क्रं.०२ उघडल्यानंतर प्रथम निम्नतम देकार सादर करणा-या L-१ निवदाकाराने (Additional Performance Security Deposit) आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता (इवद) जि.प.सांगली यांचे कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. हि ०८ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथीलक्षम असणार नाही, त्यामुळे अशा प्रकरणी कार्योत्तर मंजुरीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे व वरिष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात येवू नयेत.

प्रथम न्यूनत्तम देकाराच्या (L१) निविदाकाराने वरील विहित मुदतीत (Additional Performance Security Deposit) चा भरणा केला नाही दित्तीय न्यमत्तम (L-२) निविदाधारकास लेखी विचारणा करण्यात येईल व (L-२) निविदाकार (L-१) पेक्षा कमी दराने काम करण्यास तयार असतील त्याची निविदा मंजूर करण्यात येईल.

(अ) देकार १०% कमी दरापर्यत असल्यास १%

(ब) देकार १५% कमी दरापर्यत असल्यास -१०% कमी दरापर्यतचा १% व

(१५% - १०%)=५% =असे एकूण (१+५)= ६%

(क) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.व्दारे सादर करणे अनिवार्य राहील.

उदा. १९% कमी दराकरीता खालीलप्रमाणे पृथ:करण. :-

१०% कमी दरापर्यत १% व १५% कमी दरापर्यत (१५%-१०%) =५% तसेच

(१९%-१५%) =४% करिता (४ x २) =८% असे एकूण (१+५+८) = १४%

**उपरोक्त शासन निर्णयातील बाब क्रं.४.६.५ अन्वये खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत सूचना आहेत.**

(अ) डी.डी. मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.सांगली यांच्या नांवे असावा.

(ब) डी.डी.सरकारी/शेडयुल्ड तसेच सार्वजनिक क्षेत्रातील बॅकेचा असावा.

(ड) लिफाफा क्रं.०१ व लिफाफा क्रं.०२ उघडल्यानंतर प्रथम निम्नतम देकार सादर करणा-या L-१ निवदाकाराने (Additional Performance Security Deposit) आठ दिवसाच्या आत कार्यकारी अभियंता (इवद) जि.प.सांगली यांचे कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. हि ०८ दिवसांची मुदत कोणत्याही कारणास्तव शिथीलक्षम असणार नाही,

(छ) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / बँक प्रतिभूती हमी सादर करण्या-या कंत्राटदाराची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात यावी व संबंधित कंत्राटदारांना काळया यादीत टाकणेत येईल. तसेच अशा काळया यादीत समाविष्ट केलेल्या कंत्राटदारांनी सादर केलेल्या निविदा उघडणेत येणार नाहीत.

**उपरोक्त शासन निर्णयातील बाब क्रं.५.५ यंत्रसामुग्री बाबत खालीलप्रमाणे**

५) यंत्रसामुग्रीसाठी स्वत:च्या मालकीच्या जागेची अट टाकण्यात येऊ नये.
६) कामांसाठी नवीन यंत्रसामुग्रीचे आयुर्मान १५ वर्षे गृहीत धरण्यात यावे.
७) पहिल्या १० वर्षाकरीता अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांच्या योग्यता प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.
८) १० वर्षानंतर प्रतिवर्षी अधिक्षक अभियंता (यांत्रिकी) यांचे योग्यता प्रमाणपत्र आवश्यक राहील.
९) र.रु.१.५० कोटी रक्कमेच्या कामांसाठी तसेच सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या कामांसाठी Hot Mix Plant / Batch Mix Plant / Machinery यांच्या मालकी हक्काबाबतची अट निविदेमध्ये समाविष्ट करण्यात येवू नये. यासाठी स्वसांक्षाकित भाडे प्रमाणपत्राची अट टाकण्यात यावी.
१०) निम्नतम निविदाधारकांकडून प्राप्त धनाकर्ष वटविल्यानंतरच कार्यारंभ आदेश देण्यात येईल.

**क) निविदा सादर करणे.**

१) उपरोक्त सर्व कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ.बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केलेला असून निविदा संच " http//www.mahatenders.gov.in " या संकेतस्थळावर सर्व कामे दिनांक 14/05/2026 रोजी सायंकाळी 17.00 वाजले पासून दिनांक 08/06/2026 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत ई-निविदा पध्दतीने ऑनलाईन डाऊनलोड व /अपलोड करता येईल
२) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेला लिफाफा क्रं.०१ (तांत्रिक लिफाफा) सर्व कामे दि. १०/०६/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजलेपासून http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कार्यकारी अभियंता जि.प.सांगली यांचे कार्यालयात उघडण्यात येईल.
३) उपरोक्तप्रमाणे नमूद दोन लिफाफा पध्दतीने निविदा ऑनलाईन पध्दतीने अपलोड करुन सादर करावी लागेल. निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ बंधनकारक राहील. कंत्राटदारांनी विहित वेळेपूर्वी त्यांची निविदा अपलोड करणेची दक्षता घ्यावी.
४) कंत्राटदारांनी कामाचे नकाशे, निविदेतील अटी व शर्ती बाबनिहाय Specification कामाचे स्थळ मंजूर व साहित्याची उपलब्धता या सर्व बाबीचा अभ्यास करुन निविदा सादर कराव्यात.
५) लिफाफा क्रं.०१ मधील सर्व कागदपत्रांची छाननी करुन सदरचे छाननीमध्ये पात्र ठरलेल्या कंत्राटदारांच्या, दराचा लिफाफा क्रं.०२ उघडण्यात येईल.
६) कंत्राटदारांनी सादर केलेली निविदा व निविदेतील दर, लिफाफा क्रं.०२ उघडल्यानंतर ९० दिवसा पर्यंत वैध राहतील.
७) मंजूर निविदाधारकाकडून कामाचा करारनामा करतेवेळी खुल्या मक्तेदार वर्गासाठी निविदा रक्कमेच्या १.५% इतकी रक्कम सुरक्षा ठेव व सुशिक्षित बेरोजगार अभियंता आणि मजूर सहकारी सोसायटी कंत्राटदार वर्गासाठी निविदा रक्कमेच्या २.५% इतकी रक्कम सुरक्षा ठेव म्हणून घेतली जाईल व उर्वरीत २.५% अनामत रक्कम प्रथम धावते देयकातून कपात केली जाईल.
८) मंजूर कंत्राटदाराने सुरक्षा अनामत रक्कम ७ (सात) दिवसात भरुन विहित नमुन्यात करारनामा करुन देणे बंधनकारक राहील. कंत्राटदाराने विहित वेळेत करारनामा करुन न दिल्यास सदरचे कंत्राटदाराचे बयाणा रक्कम जप्त करुन कंत्राटदारास काळया यादीत टाकणेत येईल.
९) निविदेबाबत कोणत्याही मार्गदर्शक सूचना, शुध्दीपत्रके अथवा इतर सर्व माहिती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. ती वेळोवेळी तपासणे व निविदेमध्ये योग्य ते बदल करणे ही कंत्राटदाराची जबाबदारी आहे.
१०) शासन परिपत्रक ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्रं.पसस/१००१/प्र.क्र.४०/जल ३/दिनांक १९/१०/२००१ अन्वये मक्तेदाराकडून वसूल केलेली ५% इतकी अनामत रक्कम Defect Liability Period साठी राखून ठेवणेत येईल. सदरची अनामत रक्कम Defect Liability Period संपल्यानंतरच मक्तेदारास परत केली जाईल.
११) निविदेतील सर्व वा कोणतेही अटी व शर्ती पूर्ण न करणा-या कंत्राटदाराची निविदा वा अर्धवट सादर केलेल्या निविदा अपात्र समजल्या जातील.
१२) कोणत्याही अटीवर (Conditional) आधारित निविदा स्विकारल्या जाणार नाहीत अथवा स्विकारल्या तरी मंजूर केल्या जाणार नाही.
१३) निविदेबाबत शुध्दीपत्रक काढणेची गरज भासल्यास ते http://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

१४) ई-निविदेच्या अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदेपैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे. तसेच एखाद्या कामाची निकड लक्ष्यात घेता निविदेतील त्या कामासाठी एखादी अट शिथील करणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

१५) संक्षिप्त निविदा सूचना व सविस्तर सूचना निविदा तंत्राचा एक भाग राहिल.

१६) कोणत्याही बाबीसाठी काही तंटा निर्माण झाल्यास त्याबाबत न्यायालयात जाता येणार नाही.

१७) अन्य जि.प.कडील नोंदणी केलेल्या सुशिक्षित बेरोजगार अभियंता / मजूर सहकारी सोसायटी यांना जि.प.सांगली अंतर्गत प्रसिध्द केलेल्या निविदेमध्ये सहभाग घेता येणार नाही

१८) निम्नस्तर (L१) निविदाधारकाने काम करण्यास नकास दिल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. एखादा मक्तेदार निम्नस्तर निविदा भरुन जर काम करणेस किंवा सुरक्षा ठेव भरणेस वारंवार नकार देत असलेचे निदर्शनास आलेस, त्यांचेवर निविदा भरणेस प्रतिबंधाची कार्यवाही करणेत येईल. निम्नस्तर (L१) निविदा धारक काम करणेस तयार नसेल तर व्दित्तीय निम्नस्तर (L२) निविदा धारकास प्रथम निम्नस्तर (L१) दराने काम करणेस तयार असलेची विचारणा करुन तयार असल्यास त्याला ती निविदा बहाल केली जाईल.

१९) मक्तेदाराने मक्ता मंजूर व कार्यारंभ आदेश दिलेनंतर पंधरा दिवसांमध्ये काम सुरु करणे बंधनकारक राहील. तर पुढील पंधरा दिवसांमध्ये कामाचा प्रगती अहवाल व छायाचित्र सादर करावे. उक्त कालावधीत जर काम सुरु झाले नाही तर मक्तेदाराने विलंबाबाबत योग्य तो खुलासा सादर करणे बंधनकारक राहील. खुलासा योग्य अथवा समाधानकारक नसलेस मक्तेदाराचा कार्यारंभ आदेश विना नोटीस रदद केला जाईल.

२०) Contractor shall submit a certificate to the effect that, all the Payments to the Labour / Staff are made in bank accounts of staff Linked to Unique Ideentification Number (Aadhaar Card). The Certificate shall be submitted by the contractor within the ६० days from the commenement of contract. If the time period of contract is less than ६० days then such certificate shall be submitted within १५ days from the date of commencement of contract.

**सही/-xxx**
**कार्यकारी अभियंता (इ.व द.)**
**जिल्हा परिषद, सांगली**

Signature Not Verified
Digitally signed by KUNDALIK MANIK UBALE
Date: 2026.05.14 14:06:01 IST
Location: Maharashtra-MH